समाचार

## सीईटी संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन

# भविष्य उज्ज्वलची विद्यार्थ्यांना संधी- भोसले

**समाचार/नगर-दि.२६**

शासकीय तंत्रनिकेतन अहिल्यानगर या संस्थेत अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त सीईटी संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन माजी उपमहापौर गणेश भोसले यांच्या हस्ते झाले. माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे प्राचार्य डॉ. अजय आगरकर, उपकरणीकरण विभागप्रमुख बाळासाहेब कर्डिले, संगणक विभागप्रमुख सुधीर मुळे, अनुविद्युत विभागप्रमुख ज्ञानेश्वमर अहिरराव, विद्युत विभागप्रमुख डॉ. बाबासाहेब खरबस, प्रबंधक मनोहर चौधरी, प्रयोगशाळेचे



समन्वयक संजय हरिप यांच्यासह सर्व अधिकारी आणि कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. गणेश भोसले म्हणाले की, ज्या क्षेत्रात जाता, त्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट द्या. अद्ययावत प्रयोगशाळेचा पूर्ण क्षमतेने वापर करून आपले भविष्य उज्वल करण्याची ही एक संधी विद्यार्थ्यांना मिळाली आहे. या महाविद्यालयात आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून अद्यावत ग्रंथालय उभे करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल प्राचार्य डॉ. अजय आगरकर यांचे अभिनंदन केले. प्रास्ताविकात संस्थेचे प्राचार्य डॉ. अजय म.आगरकर यांनी संस्थेतील विद्यार्थ्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. संजय हरीप यांची भाषणे झाली.

# ज्या क्षेत्रात जाता, त्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट द्या : गणेश भोसले

## शासकीय तंत्रनिकेतन, अहिल्यानगरमध्ये अत्याधुनिक सीईटी संगणक प्रयोगशाळेचे उदघाटन ;प्राचार्य डॉ. अजय आगरकर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचा सर्वांगीण विकास

शासन दरबारी
नगर/प्रतिनिधी





**नगर :** शासकीय तंत्रनिकेतन अहिल्यानगर या संस्थेतअद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त सीईटी संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन माजी उपमहापौर गणेश भोसले यांच्या हस्ते झाले. माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे प्राचार्य डॉ. अजय म. आगरकर, श्री. उपकरणीकरण विभागप्रमुख बाळासाहेब कर्डिले, संगणक विभागप्रमुख सुधीर मुळे, अनुविद्युत विभागप्रमुख ज्ञानेश?वर अहिरराव, विद्युत विभागप्रमुख डॉ. बाबासाहेब खरबस, प्रबंधक मनोहर चौधरी, प्रयोगशाळेचे समन्वयक संजय हरिप यांच्यासह सर्व अधिकारी आणि कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते.

गणेश भोसले म्हणाले की, ज्या क्षेत्रात जाता, त्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट द्या. अद्ययावत प्रयोगशाळेचा पूर्ण क्षमतेने वापर करून आपले भविष्य उज्वल करण्याची ही एक संधी विद्यार्थ्यांना मिळाली आहे. या महाविद्यालयात आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून अद्यावत ग्रंथालय उभे करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल प्राचार्य डॉ. अजय आगरकर यांचे अभिनंदन केले. पदविका तंत्रशिक्षणात अव्वल असलेल्या या संस्थेने पुढाकार घेऊन शहरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करून शासनास सादर करावे. ते मंजूरीसाठी पाठपुरावा केला जाणार आहे. यामुळे गोर-गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय जिल्ह्यातच शक्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अशोक कडूस म्हणाले की, शासकीय तंत्रनिकेतन ही संस्था तंत्रशिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी करीत असून, या लॅबच्या उपलब्धतेमुळे संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेलाआहे, असे गौरवोद्गार काढले. तसेच या संस्थेने या वर्षी ३१५ विद्यार्थ्यांना नामांकित औद्यागिक कंपन्यांमध्ये प्लेसमेंट मिळवून दिले. अद्ययावत प्रयोगशाळा आणि संस्थेत उपलब्ध इतर संसाधनांचा वापर करून विद्यार्थ्यांनी आपले उज्जवल भविष्य घडविण्याचे त्यांनी आवाहन केले. तर विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीकोनाने विविध उपक्रम राबविणारे प्राचार्य डॉ.अजय आगरकर आणि अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

दोन हजार चौरस फुटामध्ये शंभर संगणकांचा समावेश असलेली वातानुकूलित सीईटी संगणक प्रयोगशाळा आहे. यामध्ये १०० आय सेव्हन संगणक असून, सीईटी परीक्षेसाठी आवश?यक सर्व यंत्रणा आहेत. सर्व्हर रूम, यूपीएस प्रणाली, विद्युत जनरेटर आदी सुविधा आहेत. प्रामुख्याने याचा उपयोग सीईटी परीक्षेस बसणाऱ्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरिता वापरण्यात येणार असून, यासाठी एकूण सव्वा कोटी रुपये खर्च आला आहे. सदर खर्च सीईटी सेल, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्यातर्फे करण्यात आला आहे. ही यंत्रणा उभी करणारी कंपनी तीन वर्ष पूर्ण देखभाल करणार असल्याची माहिती प्रयोगशाळेचे समन्वयक संजय हरिप यांनी दिली.

प्रास्ताविकात संस्थेचे प्राचार्य डॉ. अजय म.आगरकर यांनी संस्थेतील विद्यार्थ्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. डॉ.आगरकर संस्थेत एक ऑक्टोबर २०२४ रुजू झाले. या सहा महिन्याच्या काळात त्यांनी अनेक विद्यार्थी भिमुख प्रकल्प राबविले. डॉ.अजय आगरकर यांनी संस्थेचा सर्वांगीण विकासाचे ध्येय समोर ठेऊन सात कोटींच्या फेस लिफ्टींग योजने अंतर्गत संस्थेत विकास कामांची आणि नूतनीकरणाची मुहूर्तमेढ रोवली. गेल्या पाच महिन्यात ६५ टक्के कामे पूर्ण केली आहेत. संस्थेत स्कॅनिंग सेंटर उपलब्ध करून घेऊन ऑनलाईन पद्धतीने उत्तरपत्रिका तपासण्याची सुरुवात उन्हाळी २०२५ परीक्षेपासून होणार असल्याची त्यांनी माहिती दिली. संस्थेला नुकतेच इन्कूबेशन हब सेंटर म्हणून मान्यता मिळाली असून नवउद्योजक घडविण्याचे काम सुरू होणार आहे. त्यामुळे राज्यातील निवडक १२ तंत्र शिक्षण संस्थांमध्ये शासकीय तंत्र निकेतन, अहिल्यानगर या संस्थेचा समावेश झाला आहे, ही अभिमानाची बाब असल्याचे सांगितले.

वनविभागाच्या मदतीने संस्थेत दोन एकरांतील विस्तीर्ण जागेत दोन ठिकाणी मियावकी घन जंगलाची मान्यता नुकतीच मिळाली असून, लवकरच शासकीय तंत्रनिकेतन संस्थेचे शैक्षणिक नंदनवनात हिरवळीत रूपांतर होऊ घातले असून, सर्वोत्कृष्ट तंत्रशिक्षण संस्था बनविण्याचा ध्यास आम्ही घेतला आहे, असे मत व्यक्त केले.

संस्थेमध्ये सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२४ या काळात राज्यस्तरीय दोन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम घेण्यात आले असून, या वर्षात घेण्याचे प्रस्तावित आहेत, अशी माहिती देत स्टाफ प्रशिक्षण क्षेत्रात सुध्दा उत्तम कामगिरी संस्था करीत आहे. त्याचबरोबर विविध विभागातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय पेपर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट, पोस्टर प्रदर्शन मध्ये उत्कृष्ट सहभाग नोंदविला असून, एकूण पाच ठिकाणी त्यांना प्रथम/द्वितीय पारितोषिक मिळाले असल्याचे प्राचार्यांनी नमूद केले.

केवळ तांत्रिक उपक्रमच नाहीत तर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सुद्धा शासकीय तंत्र निकेतन संस्थेतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी उत्कृष्ट सहभाग नोंदवित अनेक बक्षीस पटकाविली आहे. यामध्ये मुलींचा बॅडमिंटन संघ (राज्यस्तरीय स्पर्धेतील विजेता, मुलींचा खो-खो संघ (ई१ झोनल स्पर्धेत उपविजेता), मुलांचा बुद्धिबळ संघ (राज्यस्तरीय स्पर्धेत उपविजेता), मुलांचा हॉलीबॉल संघाने (ई १ स्पर्धेत उपविजेता) यश संपादन केले आहे.

एमएसबीटीई आयोजित राज्यस्तरीय प्रोजेक्ट कॉम्पिटिशन २०२४ मध्ये इलेक्ट्रॉनिक विभागातील विद्यार्थ्यांनी रुपये पन्नास हजाराचे प्रथम पारितोषिक मिळविले. जीएमआरटी खोदाद पुणे यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील प्रोजेक्ट कॉम्पिटिशन २०२४ मध्ये इलेक्ट्रॉनिक विभागातील विद्यार्थ्यांनी प्रथम पारितोषिक मिळवले. इलेक्ट्रॉनिक विभागातील ऐश?वर्या गोळे व श्रुती शिंदे या विद्यार्थिनींनी समर्थ पॉलीटेक्निक आयोजित राज्यस्तरीय पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा २०२५ मध्ये प्रथम पारितोषिक मिळविले. नांदेड येथे आयोजित राज्यस्तरीय ऑनलाईन प्रश्न मंजुषा कार्यक्रमात उत्पादन अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनीने प्रथम पारितोषिक मिळविले. तसेच उत्पादन अभियांत्रिकी विभागाने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई पुरस्कृत प्रश्न मंजुषा कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

टाटा मोटर्स, कमिन्स इंडिया, आय एफ बी, बजाज ऑटो, जी. ई. एविएशन आणि सेनवियन विंड टेक्नॉलॉजी या नामांकित कंपन्या मध्ये डिसेंबर २०२४ ते एप्रिल २०२५ या काळात अनुक्रमे १०१, ४०, १४,६७,२० आणि १९ विद्यार्थी यासह एकूण ३१५ तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाले. तसेच उन्नती फाउंडेशन (इन्फोसिस) च्या माध्यमातून एकूण १०० विद्यार्थ्यांना एक महिन्याचे सॉफ्ट स्किल प्रशिक्षण दिल्याची माहिती प्राचार्य डॉ. आगरकर यांनी या दरम्यान दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दादासाहेब करंजुले यांनी करून उपस्थितांचे आभार मानले.